दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शनिवार | 7 फेब्रुवारी 2026 | अंक क्र. 260 | वर्ष 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4




Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# लाडक्या बहिणींना मोठा दिलासा

## e-KYC पोर्टल पुन्हा सुरू, 31 मार्चपर्यंत दुरुस्तीची संधी; रखडलेले हप्ते लवकरच जमा होणार

**मुंबई |** राज्यभरात अनेक लाडक्या बहिणींना पैसे मिळाले नसल्याने काही ठिकाणी मोर्चे काढण्यात आले होते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज भरताना अनेक महिलांना ई-केवायसी संदर्भातील पर्याय निवडताना काही चुकीचे पर्याय निवडले गेल्याने अनेक महिलांचे पैसे थकले होते. परंतु, आता या महिलंनया दिलासा मिळणार असल्याचे समोर आले आहे. महिला व बाल विकास विभागाने ई-केवायसीचे पोर्टल पुन्हा सुरू केले असून ई-केवायसी दुरुस्ती आता 31 मार्चपर्यंत करता येणार आहे.

लाडकी बहीण योजनेचे ई-केवायसी पोर्टल आजपासून पुन्हा एकदा सुरू करण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपासून ई-केवायसीचे पोर्टल बंद असल्याने अनेक महिलांचे पैसे थकले होते. यामुळे लाडक्या बहीणींनी राज्यातील अनेक भागांमध्ये आक्रोश व्यक्त करत मोर्चे काढले होते. याची गंभीर दखल घेत राज्य महिला व बालविकास विभागाने आदेश काढून पोर्टल सुरू केलए आहे. या निर्णयामुळे लाडक्या बहिणींना मोठा दिलासा मिळाला आहे.

### ■ लाडक्या बहीणींचे 2100 रुपये करण्याचे महायुतीकडून आश्वासन

**दरम्यान, आता जानेवारी महिन्याचा हप्ता लाडक्या बहिणींना कधी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. डिसेंबर महिन्याचा हप्ता हा 14 जानेवारी रोजी लाडक्या बहीणींच्या खात्यात जमा झाला होता. आता जानेवारीचा देखील त्याच दरम्यान फेब्रुवारी महिन्यात होण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे महायुतीच्या नेत्यांकडून विशेषतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अनेक ठिकाणी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या प्रचार सभेत बोलताना लाडक्या बहीणींचे 2100 रुपये करणार असल्याचे आश्वासन दिले आहे.**

### ■ ई-केवायसीत चुकीचा पर्याय निवडल्याने संभ्रम

'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी महिलांनी 31 डिसेंबर 2025 पर्यंत ई-केवायसी द्वारे आधार प्रमाणीकरण प्रक्रिया पूर्ण केली आहे. मात्र, ही प्रक्रिया पार पाडताना अनेक महिलांकडून कुटुंबातील सदस्यांच्या सरकारी नोकरी किंवा निवृत्तीवेतनाबाबतचा पर्याय निवडताना तांत्रिक चूक झाली असल्याचे निदर्शनास आले आहे. कुटुंबातील कोणी सदस्य सरकारी विभाग, मंडळ किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेत नियमित/कंत्राटी कर्मचारी आहे का, या प्रश्नाचे उत्तर देताना चुकीचा पर्याय निवडल्या गेल्यामुळे अनेक पात्र महिलांच्या अर्जांबाबत संभ्रम निर्माण झाला होता.

या त्रुटींमुळे लाभार्थी महिलांच्या पात्रतेची खात्री करण्यासाठी शासनाने 20 जानेवारी रोजी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष पडताळणी करण्याचे निर्देश दिले होते. परंतु, ही पडताळणी प्रक्रिया अधिक जलद आणि सुटसुटीत व्हावी, अशी मागणी लाभार्थी महिला आणि क्षेत्रीय कार्यालयांकडून सातत्याने केली जात होती. प्रत्यक्ष पडताळणीमध्ये येणाऱ्या अडचणी आणि वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी ऑनलाईन पद्धतीनेच माहिती सुधारण्याची संधी देण्याची विनंती सरकारकडे करण्यात आली होती.




### ■ दुरुस्ती करण्याची अंतिम मुदत 31 मार्चपर्यंत

याची दखल घेत प्रशासनाने ई-केवायसी प्रक्रियेत बदल करण्याची पुन्हा एकदा संधी उपलब्ध करून दिली आहे. ज्या महिलांनी माहिती भरताना चुकीचा पर्याय निवडला होता, त्यांना आता आपल्या अर्जात ऑनलाईन सुधारणा करता येणार आहे. ही दुरुस्ती करण्याची अंतिम मुदत 31 मार्च 2026 पर्यंत वाढवण्यात आली असून, यामुळे हजारो महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे आणि योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

# शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने शिवसेनेला दिला पाठिंबा

**मुंबई (विशेष प्रतिनिधी)**

मुंबईमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचा एकमेव नगरसेवक निवडून आला असून या नगरसेवकानेही आता शिवसेनेला आपला पाठिंबा दर्शवला आहे. मालाडमधील राष्ट्रवादी काँग्रेस (शप) अजित रावराणे यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. त्यामुळे शिवसेनेचे संख्याबळाला अधिक बळ प्राप्त झाले आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या तीन नगरसेवकांचाही शिवसेनेला पाठिंबा असून यासाठी सहयोगी गट बनवून अधिकृत पाठिंब्याची प्रक्रिया सुरु आहे . त्यामुळे येत्या तीन ते चार दिवसांमध्येही ही प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे .

मुंबई महापालिकेत भाजपचे ८९ आणि शिवसेनेचे २९ अशाप्रकारे ११८ असे निम्म्यापेक्षा अधिक संख्या होत आहे. तर महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसचे ०३ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा एक अशाप्रकारे नगरसेवक निवडून आलेले आहेत. त्यानुसार राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटाच्या ३ नगरसेवकांचा पाठिंबा सहयोगी गटाच्या माध्यमातून मिळवण्याचा प्रयत्न शिवसेनेच्यावतीने सुरु आहे. याबाबत दोन्ही पक्षांमध्ये चर्चा सुरु आहे . मात्र, याबाबत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झालेली नाही . त्यामुळे येत्या काही दिवसांमध्ये ही प्रक्रिया पूर्ण होवून हा पाठिंबा मिळाला जाईल असे बोलले जात आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे मालाडमधील एकमेव नगरसेवक असलेल्या अजित रावराणे यांनीही शिवसेनेला आपला पाठिंबा दर्शवला आहे. त्यामुळे शिवसेनेसोबत आता नगरसेवक अजित रावराणे राहणार आहेत. याबाबत नगरसेवक अजित रावराणे यांनी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी मी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला पाठिंबा दिला आहे . पण त्यांच्या शिवसेनेत प्रवेश केलेला नाही. मी शरद पवार साहेब यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच असून एकमेव नगरसेवक असल्यामुळे मी शिवसेनेला पाठिंबा दिला आहे. . विभागात विकास कामे करण्यासाठी विकास निधीची गरज असते आणि याचे आश्वासन शिवसेनेने दिल्यामुळे मी त्यांना पाठिंबा दिल्याचे रावराणे यांनी सांगितले.

# जिल्हा रस्ता सुरक्षा समितीवर किशोर हंबर्डे यांची अशासकीय सदस्य म्हणून निवड



**आष्टी| प्रतिनिधी**

रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी करून वाहतूक सुरक्षितता वाढविण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा रस्ता सुरक्षा समितीवर श्री. किशोर बन्सीधर हंबर्ड यांची अशासकीय सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

सदर निवड भारत सरकारच्या सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग (राष्ट्रीय महामार्ग) तसेच बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार व जिल्हा रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष मा. खा. बजरंग मनोहर सोनवणे यांच्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने करण्यात आली आहे.

रस्ते सुरक्षेच्या दृष्टीने जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या नियमित बैठका घेणे, अपघात प्रवण ठिकाणांचा आढावा घेणे तसेच प्रभावी उपाययोजना राबविण्यासाठी अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येते. त्याच अनुषंगाने मा. खासदार बजरंग सोनवणे यांनी त्यांच्या अधिकारानुसार एका अशासकीय सदस्याचे नामनिर्देशन केले असून, त्यानुसार श्री. किशोर हंबर्ड यांचा समितीत समावेश करण्यात आला आहे.

श्री. हंबर्ड यांच्या निवडीमुळे जिल्ह्यातील रस्ता सुरक्षा विषयक कामकाजास चालना मिळेल, तसेच अपघात रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.त्यांच्या निवडीबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# रुग्ण कल्याण समिती सदस्यपदी प्रफुल्ल सहस्रबुद्धे यांची निवड



**आष्टी | प्रतिनिधी**

आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयाच्या रुग्ण कल्याण समितीवर अशासकीय सदस्य म्हणून आष्टी येथील जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.आ. सुरेश धस यांच्या शिफारशीनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामदास मोराळे यांनी यासंबंधीचे आदेश जारी केले आहेत.ही समिती रुग्णालयातील सेवा-सुविधा अधिक चांगल्या करण्यासाठी, समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि उपलब्ध निधीचा योग्य वापर सुनिश्चित करण्यासाठी कार्यरत असते. नवनियुक्त सदस्याने शासनाच्या आणि समितीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल. हा आदेश तत्काळ प्रभावाने लागू झाला आहे. यांचा कालावधी तीन वर्षे किंवा पुढील आदेश येईपर्यंत यापैकी जे आधी होईल तोपर्यंत असणार आहे.या निवडीबद्दल प्रफुल सहस्त्रबुद्धे यांचे आ. सुरेश धस, माजी आ.साहेबराव दरेकर,सिताराम पोकळे,उत्तम बोडखे,दत्ता काकडे, प्रा. डॉ.विनोद ढोबळे, भीमराव गुरव, संतोष सानप, प्रवीण पोकळे, रघुनाथ कर्डिले, गणेश दळवी, शरद तळेकर,शरद रेडेकर,मनोज पोकळे आदी सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# घाटशिळा विद्यालयाच्या स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांचा विकास!

## भाऊ– बाबांच्या पदस्पर्शाने पुनीत भूमी– रामकृष्ण बांगर

**आष्टी | | प्रतिनिधी**

"बलशाली, सक्षम, राष्ट्र उभारणीत युवकांची भूमिका मौलिक असते. आजचे बालक, युवक, विद्यार्थी हे भविष्यातील राष्ट्राचे नागरिक असून त्यांच्या माध्यमातूनच राष्ट्राचे भविष्य घडते! असे सांगत शाळा या संस्काराच्या केंद्र असतात असे प्रतिपादन तहसीलदार सुरेश घोळवे यांनी केले; तर संत भगवान बाबा आणि संत वामन भाऊंच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली ही घाटशिळ पारगाव ची भूमी असल्याचे भावोद्गार सहकार व शिक्षण महर्षी रामकृष्ण बांगर यांनी काढले.

घाटशिळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष 2025-26 च्या स्नेहसंमेलन तथा विविध गुण दर्शनाच्या भव्य व्यासपीठावर उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रामकृष्ण बांगर होते.

प्रारंभी संत वामनभाऊ महाराज, संत भगवान बाबा, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले, लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी माजी उपमुख्यमंत्री स्व.अजित दादा पवार यांनाही श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



### सांस्कृतिक कार्यक्रमातून संस्कार आणि परिवर्तनाचा संदेश!

**'घाटशिळा विद्यालयाच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी घेतलेले परिश्रम हे स्तुत्य असून भविष्यातील हीच पिढी सुसंस्कृत जागृत सक्षम आणि विचारशील घडेल व राष्ट्र संपन्न बनेल!' असा विश्वास यावेळी मानून केंद्राचे केंद्रप्रमुख का.भा. खेडकर यांनी व्यक्त केला.**

यावेळी व्यासपीठावर सरपंच सौ. मीरा नवनाथ खेडकर, उपसरपंच उषाताई राजेंद्र खेडकर, केंद्रप्रमुख का. भा. खेडकर, माजी सरपंच वैजनाथ खेडकर, माजी सरपंच कालीदास खेडकर, मुख्याध्यापक सदाशिव खेडकर, टेक महिंद्रा पुणे चे सतीश खेडकर, रामदास मेजर, नारायण घोडके मेजर, माजी पं.स.सदस्य राजेंद्र खेडकर आदी सह मान्यवरांची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांनी श्री गणेशाला वंदन करून महाराष्ट्र गीतापासून अत्यंत उत्स्फूर्तपणे ताल,सुर आणि नृत्यावर गीते सादर केली. उपस्थित रसिक-श्रोत्यांनी प्रचंड टाळ्यांच्या गजरामध्ये युवा कलावंतांना प्रतिसाद दिला.

देश रंगीला, खंडेराया झाली माझी दैना, मुंडे साहेबांची तलवार, दिंडी आणि कीर्तन, आया रे तुफान, शिवगर्जना, स्त्रीभ्रूण हत्या, चला जेजुरीला जाऊ, लाल दिव्याच्या गाडीला, पिचली माझी बांगडी, दैवत छत्रपती, सावित्रीबाई फुले नाटिका.. असे एकापेक्षा एक गीते सादर करून अध्यात्म राष्ट्रभक्ती आणि समाज परिवर्तनाची नवी चेतना या स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून देण्यात आली. गावकऱ्यांनी प्रचंड प्रतिसाद देत चिमुकल्यासह शिक्षकांच्या कौतुक करत रोख बक्षिसांची शाब्बासकी दिली.

या सर्व विविध गुण दर्शनाच्या कार्यक्रमाच्या नियोजनाबद्दल विद्यार्थी आणि शिक्षकांचे प्रगती शिक्षण संस्थेच्या सचिव सौ. सत्यभामाताई बांगर, विजयसिंह बांगर, मुख्याध्यापक गोपाळघरे, मुख्याध्यापक दिलीप कंठाळे, अशोक साहेब खेडकर, डॉ.तुकाराम नेहरकर, डॉ. बबन नेहरकर, अंकुश खेडकर, संतोष घोडके यांच्यासह विविध क्षेत्रातील पदाधिकारी यांनी अभिनंदन केले.

स्नेहसंमेलनाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक एस. सी. वारभुवन, एस.एम. चोले, सी.एम.शिरसाट, प्रा.बटूळे, प्रा.बी.के. मुंडे,प्रा.के.एच.सय्यद, प्रा.बिभिषण चाटे, डी.एस. तळेकर, अशोक सांगळे, एन.एस. सानप, परजणे सर, आर. के. खेडकर, कोकाटे सर, गोरख बांगर, हंगे, पाखरे आदी सह कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.बिभिषण चाटे आणि प्रा.के.एच.सय्यद यांनी केले. मुख्याध्यापक वारभुवन सर यांनी आभार मानले.

# त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर

**भारतीय समाजक्रांतीच्या इतिहासात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव जसे तेजस्वीपणे झळकते, तसेच त्या क्रांतीच्या मूक शिल्पकार म्हणून त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांचे स्थानही तितकेच महत्त्वाचे आहे. माता रमाई म्हणजे केवळ बाबासाहेबांच्या पत्नी नव्हे, तर त्यांनी उभारलेल्या सामाजिक क्रांतीच्या वाटेवर शांतपणे, निष्ठेने आणि त्यागाने साथ देणारी महान स्त्री होती. माता रमाईंचा जन्म ७ फेब्रुवारी १८९८ रोजी झाला. अत्यंत साध्या परिस्थितीत त्यांचे बालपण गेले. शिक्षणाच्या फारशा संधी नसतानाही त्यांनी जीवनातून मिळणाऱ्या अनुभवांतून प्रगल्भता, संयम आणि सहनशीलता आत्मसात केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी विवाह झाल्यानंतर त्यांच्या आयुष्याला संघर्षांचे, उपेक्षेचे आणि कठोर वास्तवाचे अनेक पदर लाभले; मात्र माता रमाई यांनी कधीही तक्रार केली नाही, उलट त्या प्रत्येक संकटात बाबासाहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या.**



बाबासाहेबांचे शिक्षण, संशोधन, चळवळी, परदेशातील वास्तव, आर्थिक अडचणी—या सर्व काळात रमाई यांनी संसाराची संपूर्ण जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. अनेकदा उपाशीपोटी राहूनही बाबासाहेबांचे शिक्षण थांबू नये, यासाठी त्यांनी स्वतःच्या वेदनांना गप्प ठेवले. त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा त्याग म्हणजे स्वतःच्या इच्छांपेक्षा समाजाच्या उद्धाराला प्राधान्य देणे.

रमाई आंबेडकर यांनी अस्पृश्यतेचा दाह प्रत्यक्ष अनुभवला होता. समाजाकडून होणारा अपमान, अवहेलना आणि दुर्लक्ष त्यांनी शांतपणे सहन केले. बाबासाहेबांवर होणाऱ्या टीका, विरोध आणि कटकारस्थानांचे चटके त्यांनाही बसत होते; मात्र त्यांनी कधीही बाबासाहेबांच्या ध्येयावर शंका घेतली नाही. उलट "तुम्ही जे करता आहात ते या देशासाठी आवश्यक आहे" असा आत्मविश्वास त्यांनी बाबासाहेबांना दिला.

त्यांच्या जीवनात दुःखांचे प्रमाण अधिक होते—अपत्यवियोग, आजारपण, दारिद्र्य—तरीही रमाई कधीही खचल्या नाहीत. त्यांचे संपूर्ण जीवन म्हणजे त्याग, समर्पण, सहनशीलता आणि निस्वार्थ प्रेमाचे जिवंत उदाहरण आहे. बाबासाहेबांनी अनेकदा आपल्या भाषणांतून आणि लेखनातून रमाईंच्या योगदानाचा ऋणनिर्देश केला आहे, हेच त्यांच्या महानतेचे द्योतक आहे.

आज आपण बाबासाहेबांच्या विचारांवर चालताना, त्यांच्या यशाचा गौरव करताना, त्या यशामागील शांत तपस्विनी रमाई आंबेडकर यांचे स्मरण करणे तितकेच आवश्यक आहे. स्त्री-सक्षमीकरण, आत्मसन्मान आणि सामाजिक न्याय यांचे मूर्त रूप म्हणजे माता रमाई आंबेडकर होत.

१२८ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करताना, त्यांच्या जीवनातून आपण एक महत्त्वाचा धडा घ्यायला हवा—क्रांती घडवण्यासाठी केवळ व्यासपीठावर उभे राहणे पुरेसे नसते, तर पडद्यामागे उभे राहून त्याग करणारी माणसेही तितकीच महान असतात. माता रमाई आंबेडकर यांचे जीवन प्रत्येक स्त्रीसाठी प्रेरणादायी आहे आणि प्रत्येक समाजासाठी दिशादर्शक आहे. त्यांचे स्मरण म्हणजे सामाजिक न्यायाच्या लढ्याला नवी ऊर्जा देणे होय. त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांना १२८ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**■ बालाजी जगतकर (पत्रकार) परळी, बीड.
9960174697 /7020541700**

# माता रमाई आंबेडकर : महिलांसाठी मार्गदर्शक विचार : डॉ. सुवर्णा कराड

आज माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या स्मृतींना अभिवादन करीत आहोत. ही जयंती केवळ औपचारिक स्मरणाचा दिवस नसून, भारतीय स्त्रीच्या त्याग, स्वाभिमान आणि मौनातील सामर्थ्याचा विचार करण्याची संधी आहे. माता रमाईंचे जीवन हे गाजावाज्याचे नव्हते; पण त्यांच्या शांत कर्तृत्वाने इतिहासाला दिशा दिली. म्हणूनच त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या जीवनाकडे आदर्श म्हणून पाहणे आज अत्यंत आवश्यक आहे.



माता रमाई आंबेडकर यांचे जीवन संघर्षाने भरलेले होते. लहानपणापासूनच त्यांनी दारिद्र्य, उपेक्षा आणि जबाबदाऱ्या अनुभवल्या. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर परिस्थिती कठीण होती; पण त्या परिस्थितीसमोर न झुकता रमाईंनी आत्मसन्मान जपला. हा स्वाभिमानच त्यांच्या संपूर्ण जीवनाचा आधार ठरला. आजच्या महिलांसाठी ही पहिली आणि सर्वात महत्त्वाची शिकवण आहे—परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी स्वतःच्या मूल्यांशी तडजोड करू नये.

विवाहानंतर रमाईंचे आयुष्य अधिक कष्टमय झाले. पती म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाजपरिवर्तनाचे ध्येय घेऊन उभे होते. त्या ध्येयामागे रमाईंनी स्वतःचे आयुष्य शांतपणे अर्पण केले. बाबासाहेबांचे शिक्षण, त्यांचे सामाजिक कार्य आणि समाजक्रांतीचे स्वप्न यासाठी रमाईंनी स्वतःच्या सुखाचा त्याग केला. घर चालवण्यासाठी त्यांनी कठोर श्रम केले, उपास सहन केला; पण कधीही स्वाभिमान गहाण ठेवला नाही.

आजच्या काळात स्त्रीसमोर अनेक पर्याय आहेत, सुविधा आहेत; तरीही अनेकदा आत्मसन्मानाशी तडजोड केली जाते. माता रमाईंचे जीवन आजच्या महिलांना सांगते की स्वाभिमान ही स्त्रीची खरी ओळख आहे. मदत घ्यावी लागली तरी ती सन्मानाने घ्यावी; पण स्वतःच्या अस्तित्वाला कमी लेखू नये. माता रमाईंच्या जीवनात दुःखांची कमतरता नव्हती. अपत्यवियोग, नातेवाईकांचे मृत्यू, दारिद्र्य आणि आजार—या साऱ्यांचा त्यांनी सामना केला. तरीही त्यांनी आपल्या दुःखाचा भार बाबासाहेबांवर टाकला नाही. हा संयम आजच्या काळात फार मोठा संदेश देतो. संयम म्हणजे गप्प बसणे नाही, तर संकटांशी लढण्याची अंतर्गत ताकद आहे.

आजच्या महिलांवर कुटुंब, नोकरी, समाज आणि स्वतःची ओळख अशा अनेक जबाबदाऱ्या असतात. या जबाबदाऱ्या निभावताना मानसिक ताण येतो. अशा वेळी माता रमाईंचे जीवन सांगते की संयम आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर कोणतीही स्त्री संकटातून मार्ग काढू शकते.

माता रमाईंचे कार्य कधीही व्यासपीठावर झळकले नाही; पण त्याचा प्रभाव बाबासाहेबांच्या कार्यात दिसतो. बाबासाहेब अभ्यासात असताना भेटीस येणाऱ्यांना नम्रपणे थांबवणे, वेळेचे नियोजन ठेवणे, घरात शिस्त राखणे—हे सारे त्यांनी निष्ठेने केले. कोणतेही श्रेय न मागता, कोणतीही प्रसिद्धी नको म्हणत त्यांनी आपले योगदान दिले. हेच त्यांचे मूक नेतृत्व होते.

आज आपण नेतृत्व म्हणजे पुढे उभे राहणे, भाषण करणे किंवा पद मिळवणे असे समजतो. माता रमाई आपल्याला वेगळे नेतृत्व शिकवतात—पडद्यामागून योग्य दिशा देणारे, स्वतःपेक्षा ध्येय मोठे मानणारे नेतृत्व. आजच्या महिलांनी हे मूक नेतृत्व आत्मसात केले पाहिजे. धारवाड येथील उपाशी मुलांसाठी रमाईंनी आपले दागिने दिल्याची घटना त्यांच्या सामाजिक संवेदनशीलतेचे प्रतीक आहे. त्या क्षणापासून त्या केवळ रमाई राहिल्या नाहीत, तर समाजाच्या आई ठरल्या. इथेच मातृत्वाची व्यापक संकल्पना स्पष्ट होते. मातृत्व म्हणजे केवळ घरापुरते मर्यादित नसून, समाजासाठी जबाबदारी घेणेही मातृत्वच आहे. आजच्या महिलांनी माता रमाईंकडून हीच शिकवण घ्यावी—आपल्या कार्यक्षेत्रात संवेदनशील, करुणामय आणि जबाबदार भूमिका बजावावी. शिक्षिका, डॉक्टर, प्रशासक, सामाजिक कार्यकर्त्या—प्रत्येक स्त्री समाजाची आई होऊ शकते. माता रमाईंच्या आयुष्यात नात्यांतील परिपक्वतेचेही दर्शन घडते. त्यांनी कधीही 'मी आधी' असा आग्रह धरला नाही. योग्य वेळी स्वतः मागे राहणे आणि समाजाला प्राधान्य देणे—हा मोठेपणाचा गुण आजच्या महिलांनी आत्मसात केला पाहिजे.

माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या जीवनाकडे पाहताना एवढेच लक्षात ठेवले पाहिजे की इतिहास घडवण्यासाठी प्रत्येकाला प्रकाशझोतात असण्याची गरज नसते. काही स्त्रिया शांतपणे, पडद्यामागून समाजाचे भविष्य घडवत असतात. माता रमाई त्याचे सर्वोत्तम उदाहरण आहेत.

आजच्या महिलांनी जर माता रमाईंचे स्वाभिमान, संयम, सामाजिक संवेदनशीलता आणि मूक नेतृत्व आपल्या जीवनात उतरवले, तर स्त्रीसक्षमीकरण हे केवळ घोषवाक्य न राहता प्रत्यक्ष वास्तव बनेल. माता रमाईंच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनातून हीच प्रेरणा घेणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**■ डॉ. सुवर्णा कराड, प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ, महिला आघाडी, महाराष्ट्र राज्य.**



# खामगाव येथे सरपंच दत्ता भैय्या बडे यांच्या गृहप्रवेश (वास्तुशांती) सोहळा उत्साहात

**■ खामगाव : अतुल बडे**

येथील सरपंच दत्ता भैय्या बडे यांच्या नवीन निवासस्थानी वास्तुशांतीचा धार्मिक कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या प्रसंगी सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजय मुंडे यांनी सदिच्छा भेट देत बडे कुटुंबीयांना शुभेच्छा दिल्या. यावेळी बाळासाहेब नाटकर, विलास बडे, राजेभाऊ बडे, बालासाहेब सोनवणे, दत्ता कराड, सरपंच, चेअरमन, बालूआण्णा बडे, विकास बडे, छगन गायकवाड, गोविंद बडे, भागवत बडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थित पाहुण्यांचे आदरातिथ्य करण्यात आले. परिसरातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून बडे कुटुंबियांना शुभेच्छा दिल्या.

# महाविस्तार ॲपचा वापर करा : अंकुश टकले

**■ महागाव प्रतिनिधी**

कृषी विभाग महाराष्ट्र राज्य घेऊन आले आहे आपल्याशेतीसाठी एक सोपे आणि उपयुक्त App - महाविस्तार AI. चा वापर करा कारण बदलते हवामान या मुळे शेतकऱ्यांवर ताण तणाव निर्माण होत आहे या ॲपमुळे शेतकऱ्यांना नाहक त्रासाची संघर्ष टाळण्यास मदत होत असल्याचे तालुका कृषी अधिकारी अंकुश टकले यांनी सांगितले आहे.



तर या ॲप मधून आपण शेतीबद्दल/शेतीशी निगडीत विविध माहिती मिळवू शकता जसे शेती सल्ला,हवामान अंदाज, पिकांची लागवडी पासून ते काढणी पश्च्यात माहिती, खाद-बियाणे,कीड-रोग नियोजन या बद्दल माहिती व अजून खूप काही नियोजन सुलभ रीत्या प्राप्त होत असल्याने मदत निर्माण होणार असल्याने हे ॲपचा वापर करण्याचे आव्हान तालुका कृषी अधिकारी अंकुश टकले यांनी केले आहे.

तरी सर्व शेतकरी बांधवांना कृषी विभागातर्फे आव्हान करण्यात येत आहे कि आपण महाविस्तार ॲप डाउनलोड करावे व या ॲप ॲपचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी अंकुश टकले यांनी केले आहे व काही अडचणी असल्यास थेट कृषी विभागाची थेट संपर्क साधावा जेणेकरून अडीअडचणी निर्माण होणार नाही याची दक्षता कृषी विभागात मार्फत घेण्यात येणार असून योग्य ती मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे तालुका कृषी अधिकारी अंकुश टकले यांनी सांगितले आहे.

# राष्ट्रीय पशुप्रदर्शन नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केली पाहणी

## वैद्यनाथ नगरीत होणारे राष्ट्रीय पशुप्रदर्शन महाशिवरात्री निमित्त ठरणार महापर्वणी: नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी

**■ परळी वैजनाथ, प्रतिनिधी**

परळीच्या इतिहासात प्रथमच देश पातळीवरील पशुधन महा एक्सपो आयोजित करण्यात आला आहे. विशेष योगायोग म्हणजे महाशिवरात्रीच्या पर्वकाळात पशुपालकांसाठी देशपातळीवरील पशुप्रदर्शन ही महापर्वणी ठरणार असून याचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी केले आहे.

राज्याच्या पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री लोकनेत्या ना.पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून दिनांक 13 फेब्रुवारी ते 15 फेब्रुवारी दरम्यान वैद्यनाथ नगरीमध्ये राष्ट्रीय स्तरावरील पशु प्रदर्शन संपन्न होत असून आज वैद्यनाथ महाविद्यालय समोरील कार्यक्रम स्थळाच्या मैदानात नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी प्रत्यक्ष भेट दिली व पहाणी केली.

राष्ट्रीय स्तरावरील या महा पशुधन महोत्सवाच्या अनुषंगाने नगर परिषदेच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यासाठीच्या बाबी तसेच देशभरातून येणाऱ्या नागरिकांच्या सेवा सुविधा व त्यातील नगर परिषदेची जबाबदारी याबाबत नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी पाहणी करून आढावा घेतला. नगर परिषदेच्या माध्यमातून सिंचन भवन जवळील रस्त्याची तूर्त डागडुजी,देशभरातून येणाऱ्या पशुधनास पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,परिसरातील पथदिवे बसविणे तसेच तीन दिवस स्वच्छता करणे बाबत नगर परिषदमधील विभाग प्रमुखांना नगराध्यक्षानी निर्देशित केले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, गटनेते वैजनाथ सोळंके, यांच्यासह सहकारी, पदाधिकारी, नगर परिषदेचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.




# नवी मुंबईत लोककेंद्रित प्रशासनाची मजबूत पायाभरणी

## पदभार स्वीकारताच उपमहापौर दशरथ भगत यांचा थेट जनसंवाद

**■ नवी मुंबई वृत्तसंस्था**

नवी मुंबई महानगरपालिकेचे उपमहापौर म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर दशरथ भगत यांनी पहिल्याच दिवशी नागरिककेंद्रित कार्यपद्धतीला प्राधान्य देत कामकाजाची नवी सुरुवात केली.



पदभार स्वीकारताच शहराच्या विविध भागांतून आलेल्या नागरिकांशी उपमहापौर दशरथ भगत यांनी थेट संवाद साधला. नागरिकांच्या समस्या, तक्रारी तसेच नागरी सुविधांबाबतच्या अपेक्षा त्यांनी प्रत्यक्ष ऐकून घेतल्या. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित प्रश्नांवर संवेदनशीलतेने विचार करत, त्यावर तातडीने व परिणामकारक कार्यवाही होण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना व मार्गदर्शन देण्यात आले. लोकप्रतिनिधी म्हणून जनतेशी थेट संपर्क, पारदर्शक निर्णयप्रक्रिया आणि वेळेत समस्या निवारण हीच माझ्या कार्यपद्धतीची प्रमुख सूत्रे राहतील, असे उपमहापौर दशरथ भगत यांनी स्पष्ट केले. नवी मुंबई शहराच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच नागरिकांना अधिक सक्षम, सुरक्षित आणि सोयीस्कर नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने कार्य करण्याचा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# सर्वंकष विकासाच्या दृष्टीने न.प.ची 'जम्बो' विषयसूचीला मंजुरी : परळीच्या चौफेर विकासाला मिळणार गती!

## उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा ; विविध महत्त्वाकांक्षी विकास आराखडे सादर





### उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना सभागृहाने वाहिली श्रद्धांजली

**■ दरम्यान दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना सभागृहाच्या कामकाजाच्या सुरुवातीला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने संपूर्ण महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले असुन परळी नगर परिषदेला सातत्याने विकासात्मक वाटचालीसाठी पाठीशी राहणाऱ्या अजितदादा पवार यांच्या निधनाने परळी शहराची मोठी हानी झाली असल्याच्या भावना व्यक्त करत यावेळी नगरपरिषद सभागृहाच्या वतीने त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.**

**■ परळी वैजनाथ, प्रतिनिधी**

परळी वैजनाथ नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने तब्बल ३७ विषयांची 'जम्बो' विषयसूची सभेपुढे मांडण्यात आली. या सर्वसाधारण सभेत शहर विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे विविध विकास आराखडे, योजना व प्रस्तावांना सभेने तत्त्वतः मंजुरी दिली.

परळी वैजनाथ नगरपरिषद सभागृहात नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. सभेच्या प्रारंभी मागील सभेच्या इतिवृत्तांतास मान्यता देण्यात आली. त्यानंतर सन २०२६-२७ साठीच्या जिल्हा वार्षिक योजनेचा प्रारूप आराखडा सादर करण्यात आला. शासनाच्या विविध निर्णयांच्या अनुषंगाने 'नमो उद्यान' विकास, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानाची अंमलबजावणी, विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याबाबत चर्चा झाली.

शहराच्या पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी पाणीपुरवठा, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, सौरऊर्जा प्रकल्प, धुळमुक्त शहर उपक्रम, व्हिज्युअल पॉल्युशनवर उपाययोजना, पी-१,पी-२ पार्किंग व्यवस्था, तसेच वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी डीपीआर तयार करण्याबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

महाशिवरात्री निमित्त प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंग परिसरातील विविध विकास कामांचे नियोजन, शहरातील धार्मिक स्थळे व सभागृहांचे पीटीआर तयार करणे, नगरपरिषद मालकीच्या नाट्यगृह, इमारती व गाळे भाडेतत्त्वावर देणे व भाडेदर पुनर्निश्चिती यावरही सविस्तर विचारविनिमय झाला.शहर नियोजनाच्या दृष्टीने प्रादेशिक आराखडा, टीडीआर अंतर्गत जमीन मालकांना मोबदला, कोंडवाडा व्यवस्थापन, भटकी जनावरे नियंत्रणासाठी दंड व शुल्क निश्चिती, मालमत्ता फेरमूल्यांकन, अतिक्रमण सर्वेक्षण, तसेच विविध विभागांसाठी आवश्यक यंत्रसामग्री खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रियेला मंजुरी देण्यात आली.

स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ अंतर्गत परळी शहराला 'कचरा मुक्त शहर ३ स्टार' व ओडीएफ+ घोषित करण्यासाठी सहभाग नोंदविण्याचा निर्णय घेण्यात आला. पर्यावरणपूरक उपक्रमांतर्गत कचऱ्यापासून इंधन निर्मिती प्रकल्प, जल पुनर्भरण अभियानाचा प्रचार-प्रसार, तसेच संविधान भवन उभारणीसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाली. एकूणच परळी वैजनाथ शहराच्या चौफेर विकासाला चालना देणारी ही सर्वसाधारण सभा ठरली असुन आगामी काळात शहराच्या विकासकामांना वेग येण्याच्या दृष्टिकोनातून ही सर्वसाधारण सभा महत्त्वपूर्ण ठरली आहे. यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह उपनगराध्यक्षा खैसर राजा खान पठाण विविध विषय समित्यांचे सभापती, सर्व न प सदस्य, सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राधिकृत अधिकारी म्हणून नगरपरिषदेचे उपमुख्य अधिकारी संतोष रोडे यांनी कामकाजाचे संचालन केले.

---



# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका : महापौर-उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन प्रक्रिया पूर्ण

**महापौर पदासाठी ०५ तर उपमहापौर पदासाठी ०५ नामनिर्देशनपत्र दाखल, १० फेब्रुवारीला विशेष सभेत होणार निवड**

**■ नांदेड प्रतिनिधी**

### १० फेब्रुवारीला विशेष सभा, त्याच दिवशी निर्णय

**■ महापौर व उपमहापौर पदांच्या निवडीसाठी १० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभागृहात विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेचे अध्यक्षस्थान पिठासिन अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डीले भुषवणार आहेत. या सभेमध्ये महापौर व उपमहापौर निवडीचा अंतिम निकाल जाहीर केला जाणार आहे.**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदांच्या निवडीसाठी नामनिर्देशन दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली. शुक्रवार दि.०६.०२.२०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या निर्धारित वेळेत महापौर पदासाठी एकूण ०५, तर उपमहापौर पदासाठी सुध्दा ०५ नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आली.

महापौर व उपमहापौर पदासाठी तिन्ही प्रमुख गटांनी आपले उमेदवार मैदानात उतरविले आहेत. महापौर पदासाठी दाखल झालेल्या ०५ नामनिर्देशनांमध्ये भारतीय जनता पार्टी-शिवसेना आघाडीकडुन ०२, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस-वंचित बहुजन आघाडीकडुन ०१ तर एम.आय.एम.एम.पक्षाकडुन ०२ अर्ज दाखल करणाऱ्या उमेदवारांमध्ये भाजपा-शिवसेना गटातुन प्रभाग क्र.०२ मधील मुळे कविता संतोष (०२ नामनिर्देशन) , भाराकाँ-वंचित आघाडी गटातुन प्रभाग क्र.१८ मधील माहेजबीन अब्दुल फहीम (०१ नामनिर्देशन) तर एम.आय.एम.पक्षाच्या वतीने प्रभाग क्र.१५ मधील अलकेसरी सुमय्या गुल्फाषण सरहान अलकेसरी (०२ नामनिर्देशन) यांनी उमेदवारी अर्ज सादर केले असुन एकाच उमेदवाराकडून एकापेक्षा अधिक नामनिर्देशन दाखल करण्यात आल्याने छाननीनंतर चित्र स्पष्ट होणार आहे. उपमहापौर पदासाठी सुद्धा एकूण ०५ नामनिर्देशनपत्र दाखल झाली असुन, से शऔत्यामध्ये भारतीय जनता पार्टी-शिवसेना आघाडीकडुन ०२, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस-वंचित बहुजन आघाडीकडुन ०१ तर एम.आय.एम.एम.पक्षाकडुन ०२ असा पक्षनिहाय तपशील आहे. उपमहापौर पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या उमेदवारांमध्ये भाजपा-शिवसेना गटातुन प्रभाग क्र.१६ मधील दिपकसिंग काशिनाथसिंग रावत (०२ नामनिर्देशन), भाराकाँ-वंचित आघाडी गटातुन प्रभाग क्र.७ मधील राहूल मधुकर सोनसळे (०१ नामनिर्देशन) तर एम.आय. एम.पक्षाच्या वतीने प्रभाग क्र.१३ मधील धोंगडे आश्विनी दशरथ (०२ नामनिर्देशन) यांनी आपली उमेदवारी दाखल केली आहे.

---

# स्वच्छ, पारदर्शक कारभार असेल तर सहकार महर्षींनी बाहेर वजन केलेल्या ऊसाच्या गाड्या कारखान्यात घ्याव्यात

## भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा सहकार महर्षींना चिंचोलीच्या सभेतून जाहीर सवाल

**■ लातूर प्रतिनिधी**





मांजरा परिवाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांची सातत्याने आडवणूक आणि पिळवणूक केली जाते. उसाच्या प्रत्येक गाडीमागे वजनात तीन टन शेतकऱ्यांच्या ऊसाची चोरी होत असल्याचे पुरावे आहेत. जर तुम्ही खरेच प्रामाणिक, स्वच्छ आणि पारदर्शक कारभार करत असाल तर शेतकऱ्यांनी बाहेर वजन केलेल्या ऊसाच्या गाड्या साखर कारखान्यात घेवू असे शेतकऱ्यांचा कळवळा असणाऱ्या सहकार महर्षीनी हिम्मत असेल तर जाहीर करावे असे प्रतिपादन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी चिंचोली (ब) येथील भाजपाच्या प्रचार जाहीर सभेतून बोलताना केले.

भारतीय जनता पार्टीच्या निवळी गटातील उमेदवार कु. मयुरी श्रीराम आदमाने निवळी पंस गणातील उमेदवार सूर्यकांत भिवा सोनवणे आणि चिंचोली पंस गणातील उमेदवार सौ. रेखा श्रीकांत देशमाने यांच्या प्रचारार्थ लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांची चिंचोली (ब) येथे बुधवारी जाहीर सभा झाली या सभेस मतदारांनी मोठा प्रतिसाद दिला यावेळी तीनही उमेदवारासह माजी आमदार त्रिंबकनाना भिसे, भाजपा किसान मोर्चाचे विक्रम काका शिंदे, फकीरा ब्रिगेडचे अध्यक्ष संजय शिंदे, मंडल अध्यक्ष सुरज शिंदे, विश्वास कावळे, विजय कावळे, विनायक मगर, बालाजी दुटाळ, चंद्रकांत हलकुडे, काशिनाथ ढगे, वैजनाथ लवटे, सुधाकर काळे, बालाजी नाईकवाडे, सचिन सवई, अभय सोनपेठकर यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

ग्रामीण भागाच्या विकासाला गती देण्यासाठी शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी भाजपाच्या उमेदवारांना आशीर्वाद द्यावेत अशी मागणी करण्यासाठी आलो असल्याची सांगून यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत सर्वसामान्य जनतेच्या एका मताने प्रस्थापित देशमुख यांना जमिनीवर आणण्याचे काम झाले त्याचा परिणाम यावर्षी मांजरा परिवारातील साखर कारखान्यांना गाळपा अगोदरच एकतीशे पन्नास रुपये भाव जाहीर करावा लागला ही तुमच्या मताची ताकद असून जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत पुन्हा एकदा काँग्रेसवाल्यांना धडा शिकवला तर निश्चितपणे पस्तीशे रुपये भाव जाहीर केल्याशिवाय राहणार नाही. शेतकऱ्यांनो तुमच्या अन्याया विरुद्ध लढण्यास मी तयार आहे तुम्ही मला साथ द्या असे त्यांनी बोलून दाखवले.

आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, वर्षानुवर्ष या भागाचे नेतृत्व केलेल्या काँग्रेसवाल्यांनी विकासाची कोणती कामे केली. पंधरा वर्षात काँग्रेसच्या आमदारांनी काय दिवे लावले. ग्रामीण भागातील जनतेला विकासापासून वंचित ठेवले असल्याचे सांगून मी आमदार झाल्यानंतर ज्या ज्या गावात जे जे करणे शक्य आहे त्यासाठी गावागावात लाखो नव्हे तर कोठ्यावधीचा विकास निधी मंजूर करून विकास कामे काय असतात हे दाखवून दिले. केंद्र आणि राज्य शासनाच्या वैयक्तिक लाभांच्या घरकुल, गायगोठे, विहिरी यासह विविध योजनांचा मोठ्या प्रमाणात लाभ मिळवून दिला. भविष्यात शासनाच्या या सर्व योजना कायमस्वरूपी सुरू ठेवण्यासाठी भाजपा उमेदवारांना आशीर्वाद द्या असे आवाहन केले.

केंद्रात ज्याची सत्ता आहे राज्यात ज्यांची सत्ता आहे त्यांचीच जिल्ह्यात सत्ता असेल तर विकासाला गती मिळू शकतो वाडप्या आपला असेल तर निश्चितपणे योग्य हवे ते आपल्याला मिळू शकते असे विलासराव देशमुख सांगत होते याची आठवण करून देऊन केंद्रात भाजपाची सत्ता आहे राज्यात भाजपाची सत्ता आहे आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने भाजपाचा आमदार आहे त्यामुळे जिल्हा परिषदेत आणि पंचायत समितीत आपल्या हक्काचे भाजपाचे उमेदवार निवडून आले तर निश्चितपणे आपल्या गावाचा परिसराचा सर्वांगीण विकास झाल्याशिवाय राहणार नाही असेही आ. कराड यांनी बोलून दाखवले.

या सभेत उमेदवार मयुरी आदमाने यांनी मनोगत व्यक्त करून काम करण्याची संधी द्यावी असे आव्हान केले तर सुरज शिंदे आणि विजयकुमार बाप्पा कावळे यांनी आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून झालेल्या विविध विकास कामाची माहिती देऊन भविष्यात विकास कामे अधिक करण्यासाठी भाजपाचे उमेदवार बहुमताने विजयी करून रमेशआप्पांना साथ द्यावी असे आव्हान केले. या सभेस वैजनाथ लवटे, श्रीकांत झाडके, सचिन कुलकर्णी, किशोर सुडके, मल्हारी शिरसाट, रंगनाथ नवले, नानासाहेब भिसे बाळासाहेब देशमुख, मधुकर जोगदंड, सचिन देशमुख, राहुल काळे, गुरुनाथ कवठेकर यांच्यासह चिंचोली गावातील आणि परिसरातील भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी यांच्यासह मतदार बंधू भगिनी प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# राष्ट्रीय पशुप्रदर्शन नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केली पाहणी

## वैद्यनाथ नगरीत होणारे राष्ट्रीय पशुप्रदर्शन महाशिवरात्री निमित्त ठरणार महापर्वणी ; नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी

**■ परळी वैजनाथ, प्रतिनिधी**

परळीच्या इतिहासात प्रथमच देश पातळीवरील पशुधन महा एक्सपो आयोजित करण्यात आला आहे. विशेष योगायोग म्हणजे महाशिवरात्रीच्या पर्वकाळात पशुपालकांसाठी देशपातळीवरील पशुप्रदर्शन ही महापर्वणी ठरणार असून याचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी केले आहे.

राज्याच्या पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री लोकनेत्या ना.पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून दिनांक 13 फेब्रुवारी ते 15 फेब्रुवारी दरम्यान वैद्यनाथ नगरीमध्ये राष्ट्रीय स्तरावरील पशु प्रदर्शन संपन्न होत असून आज वैद्यनाथ महाविद्यालय समोरील कार्यक्रम स्थळाच्या मैदानात नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी प्रत्यक्ष भेट दिली व पहाणी केली.

राष्ट्रीय स्तरावरील या महा पशुधन महोत्सवाच्या अनुषंगाने नगर परिषदेच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यासाठीच्या बाबी तसेच देशभरातून येणाऱ्या नागरिकांच्या सेवा सुविधा व त्यातील नगर परिषदेची जबाबदारी याबाबत नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी पाहणी करून आढावा घेतला. नगर परिषदेच्या माध्यमातून सिंचन भवन जवळील रस्त्याची तूर्त डागडुजी,देशभरातून येणाऱ्या पशुधनास पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,परिसरातील पथदिवे बसविणे तसेच तीन दिवस स्वच्छता करणे बाबत नगर परिषदमधील विभाग प्रमुखांना नगराध्यक्षानी निर्देशित केले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, गटनेते वैजनाथ सोळंके, यांच्यासह सहकारी, पदाधिकारी, नगर परिषदेचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.








# देशभरातील शिक्षकांनी दिल्लीत व्यक्त केला असंतोष!

## कार्यरत शिक्षकांना टीईटी तून वगळणे व सर्वांना जुनी पेंन्शन लागू करणे सह इतर मागण्यांसाठी जंतर-मंतर वर आंदोलन!

**नवी दिल्ली / प्रतिनिधी**

देशातील सात बलाढ्य शिक्षक संघटनांनी एकत्र येत गुरुवार (दि.५ संप्टेबंर) रोजी देशाची राजधानी दिल्ली येथील जंतर-मंतर मैदानावर जोरदार आंदोलन केले आसल्याची माहिती मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

कदम यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे की, कार्यरत शिक्षकांना टीईटी तून वगळण्यात यावे, सर्वांना जुनी पेंन्शन योजना लागू करावी, नवीन शैक्षणिक धोरणातील जनविरोधी भाग वगळावा, शिक्षकांची अशैक्षणिक कामातून सुटका करावी या व इतर मागण्यांसाठी अखील भारतीय शिक्षक संघटना संयुक्त कृती समितीने दिल्ली दणाणून सोडली. अखील भारतीय माध्यमिक शिक्षक संघाचा घटक म्हणून मराठवाडा शिक्षक संघ या आंदोलनात सहभागी झाला होता.अखिल भारतीय संयुक्त कृती समिती – शिक्षक संघटना (AIJACTO) यांनी आज नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे यशस्वीपणे एक प्रभावी धरणा आंदोलन आयोजित केले. शिक्षकांच्या चळवळीतील हा एक ऐतिहासिक टप्पा ठरला आहे. शालेय शिक्षण क्षेत्रातील अनेक राष्ट्रीय पातळीवरील शिक्षक संघटना प्रथमच एका समान व्यासपीठावर एकत्र येत, दीर्घकाळ प्रलंबित शिक्षकांच्या प्रश्नांच्या निराकरणासाठी सामूहिक लढ्याची सुरुवात करण्यात आली.

या धरणे आंदोलनाचे अध्यक्षस्थान मान्यवर प्रेसीडियमने भूषविले, मराठवाडा शिक्षक संघाचे असंख्य बहाद्दर लढवय्ये कार्यकर्ते व मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे केंद्रीय उपाध्यक्ष या लढ्यात सामील झालेले आहेत. शिवाय श्री सी. एन. भारती (STFI), श्री के. नरसिंहा रेड्डी (AISTF), बसवराज गुरिकर (AIPTF) आणि सी. एल. रोज (AIFTO) यांचा समावेश होता. या कार्यक्रमाला खासदार जॉन ब्रिटास




(CPI(M) फ्लोअर लीडर), सेल्वराज (CPI), व्ही. शिवदासन (CPI(M)), कुमार नाईक (काँग्रेस) आणि राजा राम सिंह (CPI(ML)) यांच्यासह अनेक मान्यवर नेते उपस्थित होते. त्यांनी आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला आणि शिक्षकांचे प्रश्न संसदेत मांडण्याचे आश्वासन दिले. याशिवाय CPI चे राष्ट्रीय नेते के. नारायण; आंध्र प्रदेशातील शिक्षक MLC गोपी मूर्ती व तेलंगणातील श्रीपाल रेड्डी; कृषी कामगार संघटनेचे महासचिव बी. वेंकट; AIJACTO स्टीयरिंग कमिटी सदस्य चावा रवि (STFI), सदानंदम गौड (AISTF), कमला कांत त्रिपाठी (AIPTF), राममूर्ती स्वामी (AIFETO), पी. दामोदर रेड्डी (AIFTO); वर्ल्ड टीचर्स फेडरेशनचे अध्यक्ष अमियकुमार महंती; AIFUCTO चे महासचिव डॉ. अरुण कुमार; AIFRTE चे सचिव प्रा. विकास गुप्ता; AISEC च्या सचिव शारदा दीक्षित; AIITA चे अध्यक्ष रिजवान आदी मान्यवरांनी सभेला संबोधित केले.

आपल्या प्रभावी भाषणांत वक्त्यांनी AIJACTO च्या स्थापनेला एक मैलाचा दगड ठरवित, विविध शिक्षक संघटनांमध्ये निर्माण झालेल्या ऐक्याचे कौतुक केले. शिक्षक पात्रता परीक्षा (TET) संदर्भातील प्रश्न आणि सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडील निर्णयामुळे देशभरातील शिक्षक समुदाय एकत्र येण्यास मदत झाल्याबद्दल सभेने कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षणातील गुणवत्ता सुनिश्चित करण्यामागील हेतू मान्य करत असतानाच, शिक्षकांनी या निर्णयाचे कठोर परिणाम तीव्र शब्दांत निषेध केले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार इयत्ता I ते VIII साठी कार्यरत असलेले आणि

### मराठवाडा शिक्षक संघाने दिल्ली गाजवली!

सेवानिवृत्तीला पाच वर्षांपेक्षा अधिक कालावधी शिल्लक असलेले शिक्षकांनी दोन वर्षांच्या आत TET उत्तीर्ण करणे बंधनकारक आहे; अन्यथा त्यांना सेवेतून काढून टाकण्याची कारवाई होऊ शकते. मात्र सेवानिवृत्तीला पाच वर्षे किंवा त्यापेक्षा कमी कालावधी शिल्लक असलेल्या शिक्षकांना सेवेत राहण्यासाठी TET मधून सूट देण्यात आली आहे, परंतु पात्रता नसल्यास पदोन्नती मिळणार नाही. हा निर्णय २३.०८.२०१० रोजीच्या NCTE अधिसूचनेला विरोधात आहे. शिक्षणाचा हक्क कायदा (RTE) लागू झाल्यानंतर जारी केलेल्या या अधिसूचनेनुसार TET केवळ त्या तारखेनंतर नियुक्त झालेल्या शिक्षकांसाठीच बंधनकारक होते आणि सर्व कार्यरत शिक्षकांना सूट देण्यात आली होती. राज्य सरकारांनीही त्यानुसार अंमलबजावणी केली होती आणि गेल्या १५ वर्षांपासून कार्यरत शिक्षकांना TET द्यावी लागलेली नव्हती. सर्वोच्च न्यायालयासमोर ही बाब योग्यरीत्या मांडण्यात NCTE अपयशी ठरल्यामुळेच हा प्रतिकूल निर्णय आल्याची टीका संघटनांनी केली.

सभेत काही गंभीर विसंगती अधोरेखित करण्यात आल्या—उदा. सूट देण्यासाठी उर्वरित पाच वर्षांची मनमानी अट, तसेच दोन वर्षांत TET उत्तीर्ण न झाल्यास नोकरी जाण्याची कठोर शिक्षा, जरी एक दिवस जास्त शिल्लक असला तरी.

या पार्श्वभूमीवर संघटनांनी केंद्र सरकारकडे मागणी केली की कार्यरत शिक्षकांचे संरक्षण करण्यासाठी RTE कायद्यात सुधारणा करण्यात यावी आणि सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार किंवा क्युरेटिव्ह याचिका दाखल करण्यात यावी.

TET व्यतिरिक्त, धरणा आंदोलनात पुढील महत्त्वाच्या मागण्यांवरही भर देण्यात आला :

- **नवीन पेन्शन योजनेविरुद्ध (NPS) २२ वर्षांच्या संघर्षानंतर जुनी पेन्शन योजना (OPS) पुनर्स्थापित करावी आणि नव्याने आणलेली युनिफाइड पेन्शन स्कीम (UPS) रद्द करावी.**
- **राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020) मधील लोकविरोधी व खासगीकरणाला चालना देणाऱ्या तरतुदी मागे घ्याव्यात, कारण त्यातून केंद्रीकरण वाढत असून गरीबांसाठी शिक्षण दुर्गम होत आहे.**
- **गेल्या पाच वर्षांत बंद झालेल्या एक लाखांहून अधिक शाळांच्या बंदी व विलीनीकरणास तात्काळ आळा घालावा.**
- **प्राथमिक शिक्षकांना MLC निवडणुकांमध्ये मतदानाचा अधिकार द्यावा.**
- **वेतनधारक कर्मचाऱ्यांवरील उत्पन्नकराचा बोजा कमी करावा.**
- **तात्पुरत्या कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण करून त्यांना किमान वेतन लागू करावे.**
- **AIJACTO ने केंद्र सरकारकडे या सर्व प्रश्नांचे तातडीने निराकरण करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची मागणी केली आहे. अन्यथा, या अभूतपूर्व संयुक्त व्यासपीठाला अधिक बळ देऊन आंदोलन आणखी तीव्र करण्याचा निर्धार समितीने व्यक्त केला आहे.**
- **हे संयुक्त व्यासपीठ देशभरातील शिक्षकांचा सामूहिक आवाज आणि दृढ निश्चय दर्शवते. AIJACTO सर्व शिक्षक, शिक्षण कर्मचारी आणि समर्थकांना या संयुक्त आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.**

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका : महापौर-उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन प्रक्रिया पूर्ण

## महापौर पदासाठी ०५ तर उपमहापौर पदासाठी ०५ नामनिर्देशनपत्र दाखल, १० फेब्रुवारीला विशेष सभेत होणार निवड

**नांदेड प्रतिनिधी**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदांच्या निवडीसाठी नामनिर्देशन दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली. शुक्रवार दि.०६.०२.२०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या निर्धारित वेळेत महापौर पदासाठी एकूण ०५, तर उपमहापौर पदासाठी सुध्दा ०५ नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आली.

महापौर व उपमहापौर पदासाठी तिन्ही प्रमुख गटांनी आपले उमेदवार मैदानात उतरविले आहेत. महापौर पदासाठी दाखल झालेल्या ०५ नामनिर्देशनांमध्ये भारतीय जनता पार्टी-शिवसेना आघाडीकडुन ०२, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस-वंचित बहुजन आघाडीकडुन ०१ तर एम.आय.एम.एम.पक्षाकडुन ०२ अर्ज दाखल करणाऱ्या उमेदवारांमध्ये भाजपा-शिवसेना गटातुन प्रभाग क्र.०२ मधील मुळे कविता संतोष (०२ नामनिर्देशन) , भाराकाँ-वंचित आघाडी गटातुन प्रभाग क्र.१८ मधील माहेजबीन अब्दुल फहीम (०१ नामनिर्देशन) तर एम.आय.एम.पक्षाच्या वतीने प्रभाग क्र.१५ मधील अलकेसरी सुमय्या गुल्फाषण सरहान अलकेसरी (०२ नामनिर्देशन) यांनी उमेदवारी अर्ज सादर केले असुन एकाच उमेदवाराकडून एकापेक्षा अधिक नामनिर्देशन दाखल करण्यात आल्याने छाननीनंतर चित्र स्पष्ट होणार आहे.

उपमहापौर पदासाठी सुद्धा एकूण ०५ नामनिर्देशनपत्र



### १० फेब्रुवारीला विशेष सभा, त्याच दिवशी निर्णय

**महापौर व उपमहापौर पदांच्या निवडीसाठी १० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभागृहात विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेचे अध्यक्षस्थान पिठासिन अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डीले भुषवणार आहेत. या सभेमध्ये महापौर व उपमहापौर निवडीचा अंतिम निकाल जाहीर केला जाणार आहे.**

दाखल झाली असुन, से शऔत्यामध्ये भारतीय जनता पार्टी-शिवसेना आघाडीकडुन ०२, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस-वंचित बहुजन आघाडीकडुन ०१ तर एम.आय.एम.एम.पक्षाकडुन ०२ असा पक्षनिहाय तपशील आहे. उपमहापौर पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या उमेदवारांमध्ये भाजपा-शिवसेना गटातुन प्रभाग क्र.१६ मधील दिपकसिंग काशिनाथसिंग रावत (०२ नामनिर्देशन), भाराकाँ-वंचित आघाडी गटातुन प्रभाग क्र.७ मधील राहूल मधुकर सोनसळे (०१ नामनिर्देशन) तर एम.आय.एम.पक्षाच्या वतीने प्रभाग क्र.१३ मधील धोंगडे आश्विनी दशरथ (०२ नामनिर्देशन) यांनी आपली उमेदवारी दाखल केली आहे.



# अंशतः अनुदानित शिक्षकांना सन्मान निवृत्ती योजना सुरु करा - प्रा.अजित इथापे

**आष्टी | प्रतिनिधी**

अंशतः अनुदानित शाळेतून निवृत्त झालेल्या शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांना सन्मानाने जगता येईल अशी वेगळी सन्मान निवृत्ती योजना तयार करून शिक्षकांना न्याय द्यावा, अशा मागणीचे निवेदन राज्याचे शिक्षण संचालक महेश पालकर यांना देण्यात आले. अशी माहिती शिक्षक चळवळीचे कार्यकर्ते प्रा.अजित इथापे यांनी दिली.

राज्यातील काही शाळा अंशतः अनुदानित म्हणजेच २० टक्के पासून ८० टक्के पर्यंत अनुदानाच्या टप्प्यावर आहेत.या शाळा शंभर टक्के अनुदानावर कधी येतील हे आज तरी सांगता येत नाही. या शाळेत कार्यरत असणारे अनेक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी निवृत्त झालेले आहेत. तर अनेक जण निवृत्तीच्या आसपास आलेले आहेत. या शाळा शंभर टक्के अनुदान नसल्याने यांची डी.सी.पी.एस./एन.पी.एस.ची खाती व कपात ही होत नाही. त्यामुळे हे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी निवृत्त झाल्यानंतर यांना निवृत्तीनंतरचे कोणतेही लाभ मिळत नाही.

राज्यातील जवळपास ७० हजार शिक्षकांच्या भविष्याचा प्रश्न आहे. अंशतः अनुदानित शाळेतून निवृत्त होणाऱ्या शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांना निवृत्तीनंतरचा कोणताही लाभ उदाहरणार्थ निवृत्ती वेतन (पेन्शन), उपदान (ग्रॅज्युटी), भविष्य निर्वाह निधी (पी.एफ) इत्यादी लाभ मिळत नाहीत.त्याबाबतचे निवेदन शिक्षण संचालक यांना दिले, यावेळी प्रमुख उपस्थिती माजी आमदार भगवानआप्पा साळुंखे,संजय लष्करे सर,डॉ.चंद्रकांत बागणे, प्रा.रत्नाकर माळी,भारत शिरगांवकर, प्रा.अजित इथापे,भोपळे सर आदी उपस्थित होते.